

# ७४ राष्ट्रीय एकात्मता

भारत हा धर्म, भाषा, जात, जमात, वंश, प्रदेश इत्यादींचे प्रचंड वैविध्य असलेला देश आहे. अतएव, देशाच्या सर्वंकष प्रगतीसाठी आणि उन्नतीसाठी राष्ट्रीय एकात्मता साध्य करणे अत्यंत आवश्यक ठरते.

## राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ

राष्ट्रीय एकात्मतेची व्याख्या व त्या संबंधित विधाने–

'राष्ट्रीय एकात्मता म्हणजे देशाचे तुकडे पाडणाऱ्या विभाजक चळवळी टाळणे आणि संकुचित हितापेक्षा राष्ट्रीय व सार्वजनिक हिताला प्राधान्य देण्याची मनोवृत्ती संपूर्ण समाजात असणे.'[१]

**–मायरॉन वायनर**

'राष्ट्रीय एकात्मता ही एक सामाजिक–मानसिक आणि शैक्षणिक प्रक्रिया असून त्यायोगे लोकांच्या मनात ऐक्याची, दृढत्वाची आणि एकजिनसीपणाची भावना विकसित होते आणि समान नागरिकत्वाची किंवा देशाशी एकनिष्ठ राहण्याची भावना विकसित होते.'[२]

**–एच. ए. गनी**

'राष्ट्रीय एकात्मता म्हणजे दगडविटांनी उभारण्याचे घर नव्हे तसेच ती चर्चा करून अमलात आणण्यासारखी औद्योगिक योजनाही नव्हे. त्याउलट एकात्मता हा एक विचार असून तो लोकांमध्ये रुजला पाहिजे. सर्व जण जागृत होतील, असा तो विचार आहे.'

**–डॉ. एस. राधाकृष्णन**

राजकीय समुदाय किंवा राज्य बनविणाऱ्या लोकांची संलग्नता परंतु मिलाफ नाही, एकता पण एकसारखेपणा नाही, सामंजस्य पण विलीनीकरण नाही, समूहन परंतु संम्मीलन नाही, असा राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ असून तो तसाच असावयास हवा.[३]

**–राशिदुद्दीन खान**

सारांशाने राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेमध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक पैलू व त्यांचे परस्परसंबंध यांचा समावेश होतो.

## राष्ट्रीय एकात्मतेसमोरील प्रमुख अडथळे

### प्रांतवाद

प्रांतवाद म्हणजे उपराष्ट्रवाद आणि विभागीय एकनिष्ठता. यात पूर्ण देशाऐवजी विशिष्ट प्रांताविषयी किंवा राज्याविषयी आपुलकी अभिप्रेत आहे. उपक्षेत्रीयवाद म्हणजे पूर्ण राज्यापेक्षा राज्याचा भाग असलेल्या क्षेत्राबद्दल आपुलकी वाटणे.

प्रांतवाद ही भारतातील राजकीय एकात्मतेची उपप्रक्रिया आहे. ज्यांना राष्ट्रीय राजकारणात व राष्ट्रीय संस्कृतीमध्ये अभिव्यक्त होता येत नाही आणि जे नव्या राजकीय प्रक्रियेत राजकारणाचा केंद्रबिंदू ठरले नाहीत अशा अवशिष्टांची ही विकृत अभिव्यक्ती असून हे लोक स्वतःस राजकीय असंतुष्टता आणि राजकीय अपवर्जनवादातून व्यक्त करतात.[४]

प्रांतवाद हा देशभरात दिसून येणारा विचार असून तो खालील सहा पद्धतींतून व्यक्त होतो–

(१) भारतीय संघराज्यातून वेगळे होण्याची काही राज्यातील लोकांची मागणी (उदाहरणार्थ– खलिस्तान, द्रविडनाड, मिझो, नागा इत्यादी)

(२) काही क्षेत्रांतील लोकांची स्वतंत्र राज्याची मागणी (उदाहरणार्थ– तेलंगाणा, बोडोलँड, उत्तराखंड, विदर्भ, गोरखालँड इत्यादी)

(३) काही केंद्रशासित प्रदेशांतील लोकांची पूर्ण राज्याच्या दर्जाची मागणी (उदाहरणार्थ– मणिपूर, त्रिपुरा, पुदुच्चेरी, दिल्ली, गोवा, दमण आणि दीव इत्यादी)

(४) आंतरराज्यीय सीमा विवाद (चंडिगढ व बेळगावप्रमाणे) आणि नदीच्या पाण्याविषयीचे विवाद (उदाहरणार्थ– कावेरी-कृष्णा, रावी-बियास इत्यादी)

(५) धोरणे आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आक्रमक दृष्टिकोन ठेवणाऱ्या क्षेत्रीय आकांक्षा असलेल्या संघटनांची स्थापना (उदाहरणार्थ– शिवसेना, तमिल सेना, हिंदी सेना, सरदार सेना, लचित सेना इत्यादी)

(६) भूमिपुत्र सिद्धान्त यामध्ये सरकारी नोकऱ्या, खाजगी नोकऱ्या, परवाने यांमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य दिले पाहिजे असे म्हटले जाते. आसामी लोकांसाठी आसाम, मराठी लोकांसाठी महाराष्ट्र अशा त्यांच्या घोषणा असतात.

### सांप्रदायिकता

सांप्रदायिकता म्हणजे देशापेक्षा धर्मावर प्रेम आणि इतर धर्मीयांच्या हिताला डावलून आपल्या धर्माच्या हिताला चालना देण्याची प्रवृत्ती. याचे मूळ ब्रिटिश राजवटीत आहे. बिटिशांनी १९०९, १९१९ आणि १९३५ च्या कायद्यांन्वये मुस्लीम, शीख आणि इतरांना धर्मावर आधारित प्रतिनिधित्व दिले. त्यातून सांप्रदायिक भावना तीव्र बनल्या आणि सांप्रदायिक जाणिवा वृद्धिंगत झाल्या.

धर्माचे राजकारण सुरू झाल्यावर ही प्रक्रिया वेगाने घडली. त्याची विविध रूपे खालीलप्रमाणे–

(१) धर्मावर आधारित राजकीय पक्षांची स्थापना (उदाहरणार्थ– अकाली दल, मुस्लीम लीग, रामराज्य परिषद, हिंदू महासभा, शिवसेना इत्यादी.)

(२) (राजकीय पक्ष नसलेल्या) धर्मावर आधारित दबाव गटांचा उदय (उदाहरणार्थ– राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, जमात-ए-इस्लामी. अँग्लो इंडियन ख्रिश्चन असोसिएशन इत्यादी)

(३) धार्मिक दंगली (हिंदू आणि मुसलमान, हिंदू आणि शीख, हिंदू आणि ख्रिश्चन इत्यादी. बनारस, लखनौ, मथुरा, हैदराबाद, अलाहाबाद, अलिगढ, अमृतसर, मोरादाबाद आणि धार्मिक दंगलींनी प्रभावित झालेली इतर ठिकाणे)

(४) मंदिर, मशीद व अन्य धार्मिक वास्तूंविषयी विवाद (६ डिसेंबर, १९९२ रोजी कार सेवकांनी अयोध्येतील राम जन्मभूमी ही विवादित वास्तू पाडली.

सांप्रदायिकतेसाठी मुस्लिमांचा धार्मिक प्रतिगामीपणा, पाकिस्तानची भूमिका, हिंदू आक्रमकता, सरकारची अनास्था, राजकीय पक्ष आणि इतर गटांची भूमिका, निवडणुकीसाठीच्या तडजोडी, सांप्रदायिक माध्यमे, सामाजिक-आर्थिक घटक ही प्रमुख कारणे होत.

**जातीयवाद**

जातीयवाद म्हणजे राष्ट्रीय हितापेक्षा आपल्या जातीच्या गटाच्या हिताला प्राधान्य देणे. याचे मुख्य कारण जातीचे राजकारण हे होय. जातीयवाद पुढील रूपांतून व्यक्त होतो–

(१) जातीवर आधारित राजकीय पक्षाची स्थापना (चेन्नईमध्ये जस्टिस पक्ष, द्रविड मुन्नेत्र कळघम, केरळ काँग्रेस, रिपब्लिकन पक्ष, बहुजन समाजपक्ष इत्यादी.)

(२) जातीवर आधारित (राजकीय पक्ष नसलेल्या) दबाव गटांचा उदय (उदाहरणार्थ– नाडर असोसिएशन, हरिजन सेवक संघ, क्षत्रीय महासभा इत्यादी)

(३) निवडणुकीच्या वेळी आणि राज्यात मंत्रिमंडळ बनविताना जात विचारात घेऊन तिकीट देणे व मंत्रिमंडळात घेणे.

(४) बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश इत्यादी राज्यांत उच्चवर्णीय व इतर यांच्यात किंवा दोन बलवान जातींमध्ये जातीय दंगे.

(५) आरक्षण धोरणाबाबत हिंसक विवाद व निदर्शने.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठीचे आरक्षण ही ब्रिटिश काळातील धर्मावर आधारित मतदारसंघाची शिल्लक राहिलेली खूण आहे. यामुळे त्यांच्या मूळ जातीला महत्त्व दिले जाते आणि आपण कुठल्या जातीत जन्मलो याची लोकांना जाणीव करून दिली जाते. हे राष्ट्रीय एकात्मतेला पूरक नाही,[५] असे बी. के. नेहरू यांनी म्हटले आहे.

राज्य स्तरावर राजकारण म्हणजे दोन मुख्य जातींमधील संघर्ष असतो. उदाहरणार्थ– आंध्र प्रदेशमध्ये कम्मा विरुद्ध रेड्डी, कर्नाटकमध्ये लिंगायत विरुद्ध वोकलिग्ग, केरळमध्ये नायर विरुद्ध एझावा, गुजरातमध्ये बनिया विरुद्ध पाटीदार, बिहारमध्ये भूमिहार विरुद्ध राजपूत, हरियाणामध्ये जाट विरुद्ध अहिर, उत्तर प्रदेशमध्ये जाट विरुद्ध राजपूत, आसाममध्ये कलिता विरुद्ध अहोम इत्यादी.

**भाषावाद**

भाषावाद म्हणजे स्वत:च्या भाषेविषयी प्रेम आणि इतर भाषिक लोकांबद्दल तिरस्कार. प्रांतवाद, सांप्रदायिकता आणि जातीय वादाप्रमाणे भाषावाद हासुद्धा राजकीय प्रक्रियेचा भाग आहे. याचे दोन पैलू आहेत–

(१) राज्यांची भाषावार पुनर्रचना आणि–

(२) केंद्राची अधिकृत भाषा ठरविणे.

सन १९५३ मध्ये तत्कालीन मद्रास राज्यातून आंध्र राज्य हे पहिले भाषावार राज्य बनविण्यात आले आणि त्यानंतर राज्यांची भाषावार पुनर्रचना करण्याची देशभरातून मागणी सुरू झाली. त्यामुळे १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना आयोगाच्या[६] (१९५३-१९५५) शिफारशींनुसार मोठ्या प्रमाणावर राज्यांची भाषावार पुनर्रचना करण्यात आली. त्यानंतरसुद्धा जन आंदोलने आणि राजकीय परिस्थितीमुळे भारताचा राजकीय नकाशा बदलत राहिला आणि मुंबई, पंजाब, आसाम इत्यादी राज्यांचे विभाजन करावे लागले. इ. स. १९५६ मध्ये देशात १४ राज्ये आणि ६ संघराज्य प्रदेश होते; ती संख्या आता (२०१७ च्या सुरुवातीची स्थिती) २९ राज्ये आणि ७ संघराज्य प्रदेश अशी झाली.[७]

अधिकृत भाषा कायदा (१९६३) ने हिंदी ही केंद्राची अधिकृत भाषा बनविल्यानंतर दक्षिण भारत आणि पश्चिम बंगालमध्ये हिंदीविरोधी आंदोलने उसळली. त्यावर जोपर्यंत बिगर हिंदी भाषिक राज्यांची इच्छा असेल तोपर्यंत ते इंग्रजीचा सहराज्यभाषा किंवा अधिकृत सहभाषा म्हणून वापर करू शकतील, असे केंद्राने आश्वासन दिले. शिवाय त्रिभाषिक सूत्र (इंग्लीश, हिंदी व क्षेत्रीय भाषा) तमिळनाडूने लागू केले नाही.[८] या सर्व पार्श्वभूमीवर घटनाकारांना जसे अपेक्षित होते तशी हिंदी ही भारताच्या मिश्र संस्कृतीची भाषा बनू शकली नाही.

अलीकडील काळात तेलुगू देसम पक्ष, आसाम गण परिषद, शिवसेना यांसारख्या क्षेत्रीय पक्षांच्या उदयामुळे भाषावादाचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनला आहे.

## राष्ट्रीय एकात्मता परिषद

नवी दिल्ली येथे केंद्र सरकारने आयोजित केलेल्या 'विविधतेतून एकता' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत ठरविल्याप्रमाणे १९६१ मध्ये राष्ट्रीय एकात्मता परिषदेची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान हे या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष होत. केंद्रीय गृहमंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय पक्षांचे सात नेते, विद्यापीठ अनुदान मंडळाचा अध्यक्ष, दोन शिक्षण तज्ज्ञ, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठीचे आयुक्त आणि पंतप्रधानांनी नियुक्त केलेले इतर सात सदस्य यांचा आयोगात समावेश आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या समस्येच्या सर्व पैलूंचे परीक्षण करून त्यासाठी आवश्यक त्या शिफारशी करण्याचे काम परिषदेवर सोपविण्यात आले. परिषदेने राष्ट्रीय एकात्मतेसाठी अनेक शिफारशी केल्या. या शिफारशी कागदावरच राहिल्या आणि केंद्राने व राज्यांनी त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले नाहीत.

इ. स. १९६८ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय एकात्मता परिषदेची पुनर्रचना केली. परिषदेची सदस्यसंख्या ३९ वरून ५५ पर्यंत वाढविण्यात आली. उद्योग,. व्यापार आणि कामगार संघटनांच्या प्रतिनिधींचा त्यात समावेश करण्यात आला. परिषदेची श्रीनगर येथे बैठक झाली आणि राष्ट्रीय दृढतेच्या मुळावर घाला घालणाऱ्या सर्व प्रवृत्तींचा धिक्कार करणारा ठराव संमत करण्यात आला. राष्ट्रीय ऐक्य व दृढता यांसाठी समाजातील विधायक

---

(६) हा फझल अली यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय राष्ट्रीय आयोग होता. के. एम. पणिक्कर आणि एच. एन. कुंझरू हे या आयोगाचे इतर दोन सदस्य होते.

(७) सन २००० मध्ये मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांतून अनुक्रमे छत्तीसगढ, उत्तरांचल (नंतर उत्तराखंड) आणि झारखंड या तीन नवीन राज्यांची निर्मिती करण्यात आली. (२ जून, २०१४ रोजी पूर्वीच्या आंध्र प्रदेश राज्याचे विभाजन करण्यात येऊन तेलंगाणा या नव्या राज्याची निर्मिती करण्यात आली. तेलंगाणा हे भारतातील २९ वे राज्य होय.— संपादक)

(८) तमिळनाडू सरकारने त्रिभाषा सूत्राला विरोध केला आणि राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये इंग्रजी आणि तमिळ या दोनच भाषा शिकविणे चालू ठेवले.

शक्तींना चालना देण्याचे राजकीय पक्ष, संघटना आणि माध्यमे यांना आवाहन करण्यात आले. प्रांतवाद, सांप्रदायिकता आणि भाषावाद यांवर अहवाल देण्यासाठी तीन समित्या बनविण्यात आल्या. परंतु, त्यातून फारसे साध्य झाले नाही.

सन १९८० मध्ये परत एकदा केंद्र सरकारने निष्क्रिय झालेल्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेची पुनर्रचना केली. तिचे सदस्यत्व अधिक व्यापक करण्यात आले. सांप्रदायिक सद्भाव, ईशान्य क्षेत्रातील अशांतता आणि नव्या शिक्षण प्रणालीची आवश्यकता हे तीन विषय परिषदेसमोर होते. राष्ट्रीय ऐक्याला धोका उत्पन्न करणाऱ्या सांप्रदायिक आणि इतर विघटनवादी शक्तींवर सतत लक्ष ठेवण्यासाठी परिषदेने स्थायी समितीची स्थापना केली.

इ. स. १९८६ मध्ये राष्ट्रीय एकात्मता परिषदेची पुनर्रचना करण्यात आली आणि सदस्यांच्या संख्येत आणखी वाढ केली गेली. पंजाबमधील दहशतवाद हा देशाच्या एकात्मतेवर, ऐक्यावर आणि निधर्मी आदर्शांवर हल्ला आहे, असे परिषदेने प्रतिपादन केले. त्यानुसार पंजाबमधील दहशतवादाचा बीमोड करण्याचा ठराव संमत करण्यात आला. सतत कार्यरत राहण्यासाठी परिषदेने एका २१ सदस्यीय समितीची स्थापना केली. समितीला सांप्रदायिक सद्भाव राखण्यासाठी व राष्ट्रीय ऐक्याचे रक्षण करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना आखण्यास सांगण्यात आले.

इ. स. १९९० मध्ये व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय आघाडी सरकारने राष्ट्रीय एकात्मता परिषदेची पुनर्रचना केली. परिषदेची सदस्य संख्या १०१ पर्यंत वाढविण्यात आली. यामध्ये पंतप्रधान हे अध्यक्ष, काही केंद्रीय मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री, राष्ट्रीय आणि क्षेत्रीय पक्षांचे नेते, महिला, व्यापार आणि उद्योग यांचे प्रतिनिधी, विद्वान, पत्रकार आणि सार्वजनिक जीवनातील व्यक्ती यांचा समावेश करण्यात आला. या परिषदेसमोर पंजाब समस्या, काश्मीर समस्या, फुटीरवादी करीत असलेली हिंसा, सांप्रदायिक सद्भाव आणि अयोध्येतील रामजन्मभूमी–बाबरी मशीद प्रश्न असे अनेक विषय होते. ही परिषद फारसे भरीव कार्य करू शकली नाही.

सन २००५ मध्ये संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय एकात्मता परिषदेची पुनर्रचना केली गेली. सन १९९२ मध्ये राष्ट्रीय एकात्मता परिषदेची बैठक झाली होती. या बैठकीनंतर बारा वर्षांनी १०३ सदस्य असलेली राष्ट्रीय एकात्मता परिषद गठित करण्यात आली. काही केंद्रीय मंत्री, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय व क्षेत्रीय पक्षांच्या नेत्यांव्यतिरिक्त राष्ट्रीय एकात्मता परिषदेत राष्ट्रीय आयोगांचे अध्यक्ष, सार्वजनिक जीवनातील प्रतिष्ठित व्यक्ती, उद्योग, माध्यमे, कामगार आणि महिला यांच्या प्रतिनिधींचाही राष्ट्रीय एकात्मता परिषदेत समावेश करण्यात आला. राष्ट्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या मुद्द्यांसंदर्भात प्रभावी नवीन उपक्रम सुरू करून परस्पर संबंध वाढविणे, राष्ट्रीय एकात्मतेबाबतच्या मुद्द्यांचा आढावा घेणे आणि याबाबत शिफारशी करणे यासाठी राष्ट्रीय एकात्मता परिषद हे महत्त्वाचे पीठ आहे.

ओडिशा, कर्नाटक, महाराष्ट्र, जम्मू आणि काश्मीर, आसाम अशा विविध राज्यांतील सांप्रदायिक हिंसक दंगलींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मता परिषदेची चौदावी बैठक २००८ मध्ये झाली. अल्पसंख्याक, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यामध्ये शिक्षणाला चालना देणे, राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणारे घटक, क्षेत्रीय असमतोल दूर करणे, जात आणि इतर बाबींवरून होणारे विभाजन, अतिरेकी वाद यांना प्रतिबंध करणे, सांप्रदायिक सद्भावाला चालना देणे, अल्पसंख्याकांना संरक्षण देणे आणि समतोल विकास असे महत्त्वाचे मुद्दे बैठकीच्या विषय पत्रिकेत होते.

एप्रिल, २०१० मध्ये संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा एकदा राष्ट्रीय एकात्मता परिषदेची पुनर्रचना केली. या पुनर्रचनेनुसार सध्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेत १४७ सदस्य

असून त्यामध्ये केंद्रीय मंत्री, लोकसभा आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते, सर्व राज्ये व विधिमंडळे असलेल्या संघराज्य प्रदेशांचे मुख्यमंत्री यांचा समावेश होतो. त्याबरोबरच या परिषदेत राष्ट्रीय आणि क्षेत्रीय राजकीय पक्षाचे नेते, राष्ट्रीय आयोगांचे अध्यक्ष, प्रसिद्ध पत्रकार, सार्वजनिक जीवनातील व्यक्ती, उद्योग आणि महिला संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश होतो. सांप्रदायिकता, जातीयता आणि क्षेत्रीयता यांपासून उद्भवणाऱ्या धोक्यांवर उपाययोजना सुचविणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

ऑक्टोबर, २०१० मध्ये सरकारने राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या स्थायी समितीची स्थापना केली. या समितीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय गृहमंत्री असून चार केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे नऊ मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय एकात्मता परिषदेचे पाच स्वीकृत सदस्य यांचा या समितीत समावेश होतो. राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या बैठकांच्या विषयपत्रिकेतील विषयांना समिती अंतिम रूप देते.

राष्ट्रीय एकात्मता परिषदेची पंधरावी बैठक सप्टेंबर, २०११ मध्ये संपन्न झाली. सांप्रदायिकता आणि सांप्रदायिक हिंसाचारावर उपाययोजना, सांप्रदायिक हिंसाचार विधेयकाबाबत दृष्टिकोन, सांप्रदायिक सद्भावाला चालना देण्यासाठी उपाययोजना, भेदभाव (विशेषत: अल्पसंख्य आणि अनुसूचित जमाती बाबतचा) नाहीसा करण्यासाठी उपाययोजना, सरकारने व पोलिसांनी नागरी दंगे वा अशांतता कशी हाताळावी आणि धर्म आणि जात यांच्या नावाखाली युवकांमधील कट्टरतावादी प्रवृत्तीला कसा आळा घालावा, हे बैठकीतील विषय होते.

राष्ट्रीय एकात्मता परिषदेची सोळावी बैठक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी पार पडली. हिंसेचा निषेध करणे, सर्व संप्रदायात सलोख्याचे संबंध दृढ करण्यासाठी सर्व उपाययोजना करणे, लोकांमधील भेदाभेद व विवाद कायद्याच्या चौकटीत सोडविणे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील अत्याचारांचा निषेध करणे, लैंगिक अत्याचारांचा निषेध करणे आणि सर्व स्त्रियांना समान संधींसह त्यांचा सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य करण्यासाठी त्यांना स्वातंत्र्याची फळे चाखावयास मिळतील, हे सुनिश्चित करणे आणि सार्वजनिक ठिकाणी दिवसाच्या वा रात्रीच्या कोणत्याही वेळी वावरण्याचा स्त्रियांचा हक्क संरक्षित करणे या संबंधीचा ठराव या बैठकीत संमत करण्यात आला.

**राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या बैठका**

| क्रमांक | कधी झाली |
|---|---|
| पहिली बैठक | २ आणि ३ जून, १९६२ |
| दुसरी बैठक | २० ते २२ जून, १९६८ |
| तिसरी बैठक | १२ नोव्हेंबर, १९८० |
| चौथी बैठक | २१ जानेवारी, १९८४ |
| पाचवी बैठक | ७ एप्रिल, १९८६ |
| सहावी बैठक | १२ सप्टेंबर, १९८६ |
| सातवी बैठक | ११ एप्रिल, १९९० |
| आठवी बैठक | २२ सप्टेंबर, १९९० |
| नववी बैठक | २ नोव्हेंबर, १९९१ |
| दहावी बैठक | ३१ डिसेंबर, १९९१ |

| क्रमांक | कधी झाली |
|---|---|
| अकरावी बैठक | १८ जुलै, १९९२ |
| बारावी बैठक | २३ नोव्हेंबर, १९९२ |
| तेरावी बैठक | ३१ ऑगस्ट, २००५ |
| चौदावी बैठक | १३ ऑक्टोबर, २००८ |
| पंधरावी बैठक | १० सप्टेंबर, २०११ |
| सोळावी बैठक | २३ सप्टेंबर, २०१३ |

## सांप्रदायिक सद्भावनेसाठी राष्ट्रीय प्रतिष्ठान

सन १९९२ मध्ये सांप्रदायिक सद्भावनेसाठीच्या राष्ट्रीय प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली. ही एक स्वायत्त संघटना असून केंद्रीय गृह मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येते. हे प्रतिष्ठान सांप्रदायिक सद्भावना, बंधुता आणि एकात्मता याला चालना देते.

**ध्येये व उद्दिष्टे**

या प्रतिष्ठानची ध्येये व उद्दिष्टे खालीलप्रमाणे—

**ध्येय :** भारत सांप्रदायिक आणि इतर सर्व प्रकारच्या हिंसाचारापासून मुक्त होईल आणि सर्व नागरिक, विशेषत: बाल आणि युवा, शांतता व सद्भावाने एकत्र राहतील.

**उद्दिष्टे :** सांप्रदायिक सद्भावना जोपासणे, राष्ट्रीय एकात्मता दृढ करणे, सहकार्याच्या सामाजिक कृतीतून विविधतेतील एकता वृद्धिंगत करणे, जागृतीसाठी कार्यक्रम करणे, हिंसाचाराने पीडित झालेल्या व्यक्तींना, विशेषत: बालकांना साहाय्य करणे, भारतातील सर्वांच्या संरक्षणासाठी, शांततेसाठी आणि समृद्धीसाठी आंतरधर्मीय विचारविनिमयाला प्रोत्साहन देणे ही याची उद्दिष्टे आहेत.

**प्रतिष्ठानची कार्ये**

प्रतिष्ठानने सुरू केलेली कार्ये खालीलप्रमाणे—

(१) सामाजिक हिंसाचाराने प्रभावित झालेल्या बालकांना त्यांची काळजी घेण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणासाठी आणि योग्य पुनर्वसनासाठी आर्थिक साहाय्य देणे.

(२) स्वतंत्रपणे किंवा शैक्षणिक संस्था, अशासकीय संस्था आणि इतर संघटनांशी सहकार्य करून विविध उपक्रमांद्वारा सांप्रदायिक सद्भाव वाढविणे व राष्ट्रीय एकात्मतेला चालना देणे.

(३) संबंधित विषयांचे अध्ययन करणे आणि त्यासाठी संस्थांना वा विद्वानांना शिष्यवृत्ती देणे.

(४) सांप्रदायिक सद्भाव आणि राष्ट्रीय एकात्मता यांसंबंधी उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना पारितोषिके देणे.

(५) प्रतिष्ठानची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केंद्र वा राज्यसरकारे वा संघराज्य प्रदेशांची प्रशासने, औद्योगिक/व्यापारी संघटना, अशासकीय संस्था आणि इतर यांचा सहभाग सुनिश्चित करणे.

(६) या विषयांवर माहितीसेवा देणे. माहिती पुस्तिका वा प्रबोधन साहित्य प्रसिद्ध करणे.